कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
इ-मेल: directorcrs78@gmail.com

जा.क्र.मसंकें/सामान्य/११४/२०२६ दि.०९/०१/२०२६

## निविदा/कोटेशन सूचना

**विषय:- मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत रस्ते व रोड संबंधित कामाकरिता हायड्रॉलीक ट्रॉलीने मुरूम वाहतूक (भरणे व उतरविणे) दर (कोटेशन) बोलविण्यासाठी व्यापक प्रसिद्धी करणेबाबत.......**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत रस्ते व रोड संबंधित कामाकरिता हायड्रॉलीक ट्रॉलीने मुरूम वाहतूक (भरणे व उतरविणे) करण्याकरिता निब्विदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा/कोटेशन मसुदा सोबत जोडलेला आहे.

**अटी व शर्ती**

1. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते दुपारी ५.३० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील
2. निविदा मसुदा मध्ये नमूद केल्याप्रमाणे दर नमूद करावे तसेच दर सर्व करासह (जीएसटीव इतर करासह) नमूद करावे.
3. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला अंतर्गत रस्ते व रोड संबंधित कामाकरिता हॉयड्रॉलीक ट्रॉलीने मुरूम वाहतूक (भरणे व उतरविणे) करताना काही नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.
4. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला अंतर्गत रस्ते व रोड संबंधित कामाकरिता हॉयड्रॉलीक ट्रॉलीने मुरूम वाहतूक (भरणे व उतरविणे) करताना या कार्यालय मार्फत कोणताही मनुष्यबळ मिळणार नाही.
5. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला अंतर्गत रस्ते व रोड संबंधित कामाकरिता हॉयड्रॉलीक ट्रॉलीने मुरूम वाहतूक (भरणे व उतरविणे) करताना इंधन किंवा इंधनासाठी अग्रिम धनराशी मिळणार नाही.
6. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचे करिता उपरोक्त कामासाठी वाहतूक करतांना कुठलीही दुर्घटना/अपघात /जीवितहानी अथवा वाहन बिघाड झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदार यांची राहील व त्यावर होणारा खर्च सुध्दा निविदाधारक/कंत्राटदार यांना करावा लागेल.
7. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदाधारकांना बंधनकारक राहील.
8. नेमून दिलेले काम पूर्ण करण्यात यावे. कामाबाबत काही तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
9. देयकावर जीएसटी नंबर असणे अनिवार्य आहे.

10. निविदाधारक/कंत्राटदरांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

11. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचे करिता उपरोक्त कामासाठी वापरण्यात येणारे वाहन सुस्थितीत, सर्व परवाना मुदतीत असले पाहिजे या संबधी वाहतूक करतांना कुठलीही अडचण आल्यास त्यास निविदाधारक/कंत्राटदार जबाबदार राहील.

12. निविदाधारक/कंत्राटदारास देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

13. उपरोक्त काम करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/मा. संशोधन संचालक, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राही.

14. निविदेतील दर एक वर्षा करिता वैध राहतील.

15. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिलानुसार **दि. १९.०१.२०२६** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

16. कोटेशन तपशिलासंबंधी अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला कार्यालयाशी संपर्क साधावा

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र,
डॉ. पं. दे.कृ.वि., अकोला

# निविदा (कोटेशन) मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला अंतर्गत रस्ते व रोड संबंधित कामाकरिता हायड्रॉलीक ट्रॉलीने मुरूम वाहतूक (भरणे व उतरविणे) संबंधिक कामे कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता दर खालील प्रमाणे आहेत.

| अ .क्र. | कामाचा तपशील | प्रमाण | दर (.रु) |
|---|---|---|---|
| १ | हायड्रॉलीक ट्रॉलीने मुरूम वाहतूक (भरणे व उतरविणे) | प्रति/कि.मी./ट्रोली | |
| | हायड्रॉलीक ट्रॉलीने मुरूम फक्त वाहतूक व खालीकरणे | प्रति/कि.मी./ट्रोली | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

ठिकाण:

दिनांक:

**स्वाक्षरी**

नाव व संपूर्ण पत्ता